# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी.सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५
दुरध्वनी क्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./३९४८ /२०२० — दि. २० /११/२०२०

## परिपत्रक

विषय :- प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणेबाबत.

संदर्भ :- उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. उशिसं/२०२०/स्पर्धा परीक्षा/प्रशा-३/७६५६, दि. ०६/११/२०२०.

विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग व गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वोतोपरी प्रयत्न करीत असून उक्त संदर्भिय पत्रानुसार कार्यवाही घेण्यास्तव आपल्या महाविद्यालयात/शैक्षणिक विभागामध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करावे व स्पर्धा परीक्षेबाबत योग्य मार्गदर्शन करु शकणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करावी. नेमणुक आदेशाची प्रत विभागीय सहसंचालक यांचे कार्यालयास तसेच विद्यापीठास न चुकता सादर करावी.

सोबत :- संदर्भिय पत्र.

(डॉ. ईश्वर मोहुर्ले)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रतिलिपी:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्विय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरु यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. विभाग प्रमुख, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
४. मा. प्राचार्य, संलग्नित सर्व महाविद्यालये.

(डॉ. विजय सिल्हारे)
उपकुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,
मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१
web:www.dhepu ne.gov.in E-Mail prash.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६०५१५१२/२६१३०६२७/२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१२१२५३

क्र.उशिसं/२०२०/ स्पर्धापरिक्षा/प्रशा-३/७६५६

दिनांक 17 NOV 2020

प्रति,

प्राचार्य,
सर्व अनुदानित, विना अनुदानित, कायम विनाअनुदानित,
शासकीय महाविद्यालये.

विषय : प्रत्येक महाविद्यालयात स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे.

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या प्रशासकीय सेवापूर्व परिक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढवे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वोतोपरी प्रयत्न करीत असून पूर्ण राज्यात अशी ०६ भारतीय प्रशासकीय सेवापूर्व परिक्षा प्रशिक्षण केंद्रे शासनाने सुरू केलेली आहेत. यात संबंधित विषयाच्या तज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्रामधून दरवर्षी सुमारे ५४० मुलांना विनामूल्य प्रशिक्षण देण्यात येते, शिवाय त्यांना मासिक खर्चासाठी दरमहा शिष्यवृत्ती ही दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रमध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परिक्षा देणाऱ्या मुलांची संख्या वाढली आहे. परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही असे दिसून येते. यासंदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणाऱ्या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्रांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रिय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परिक्षेसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जास्त मुलांकडून फॉर्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाव्दारे स्थापन केलेल्या परिक्षा केंद्रांमध्ये प्रवेश परिक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ.सर्व कामे करणेसाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शन करू शकणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणुक करावी. जेणेकरून त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अनेक वर्षे मिळू शकेल. नेमणुक आदेशाची प्रत विभागीय सहसंचालक कार्यालय तसेच संबंधित विद्यापीठाचे कुलसचिव यांना देण्यात यावी.

सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना सुचित करण्यात येते की, आपल्या विभागातील महाविद्यालयांकडून उक्त सूचनांची अंमलबजावणी होण्याबाबत पाठपुरावा करावा व दरमहा विवरणपत्र देवून किती महाविद्यालयात समन्वयक नेमण्यात आले याची माहिती या कार्यालयास सादर करण्यात यावी.

सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे यांना कळविण्यात येते की, स्पर्धा परिक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य त्या सूचना आपल्या अखत्यारितील सर्व महाविद्यालयांना द्याव्यात. विद्यापीठ स्तरावर एक समन्वय समितो नेमावी व समितीमार्फत सर्व महाविद्यालयातील केंद्रांना वेळोवेळी व नियमित मार्गदर्शन करण्यात यावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करतांना केवळ संख्यात्मक अहवाल सादर करावा.

सदर सूचना या विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी असून महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षांमध्ये महाराष्ट्रातील अधिक विद्यार्थी यशस्वी व्हावेत यासाठी आहे. सदर समन्वयक पदासाठी कोणतेही मानधन/विशेष वेतन लागू होणार नाही.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-०१.

प्रत माहितीस्तव सनिवय सादर.
१. मा.स्वीय सहाय्यक, मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.

प्रत माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव :
१. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे.
२. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण.